
www.rajdand.com
सातारा शुक्रवार
२३.२.२०२४
पृष्ठ ४ ! मूल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

## महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांची प्रकृती खालावली



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते मनोहर जोशी यांची प्रकृती खालावल्याने त्यांना हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ते डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहेत, हिंदुजा रुग्णालयाने याबाबत माहिती दिली. जोशी यांना दुपारीच अस्वस्थ वाटू लागल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

गेल्या वर्षीही ८६ वर्षीय मनोहर जोशी यांची प्रकृती खालावल्यामुळे त्यांना हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी त्यांना ब्रेन ट्यूमर झाल्याचे निदान झाले होते. मात्र, नंतर त्यांची प्रकृती सुधारली. आता आज पुन्हा एकदा प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना हिंदुजा रुग्णालयात दाखल करावे लागले.

मनोहर जोशी यांचा परिचय

मनोहर जोशी शिवसेनेचे संस्थापक दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू आणि जवळचे सहकारी मानले जात होते. जोशी यांनी १९७० च्या दशकात शिवसेनेकडून विधान परिषदेवर निवडून येऊन आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. १९७६ ते १९७७ या काळात ते मुंबईचे महापौरही होते. मनोहर जोशी यांनी (१९९५-१९९९) काळात राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषवले. पुढे अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या कार्यकाळात त्यांनी लोकसभा अध्यक्ष (२००२-२००४) म्हणून काम केले.

# शरद पवार गटाला अखेर चिन्ह मिळालं

## निवडणूक आयोगाचं 'तुतारी'वर शिक्कामोर्तब!



**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस आणि घड्याळ हे चिन्ह उपमुख्यमंत्री अजित पवारांना दिले. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी मूळ पक्ष हा अजित पवारांचाच असल्याचा निर्णय दिला. यावर ज्येष्ठ नेते शरद पवारांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली. या प्रकरणी सोमवारी सुनावणी पार पडली. त्यावेळी कोर्टाने निवडणूक आयोगाला आठवड्यात शरद पवारांच्या पक्षाला चिन्ह देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार तीन दिवसातच आयोगाने शरद पवारांच्या पक्षाला तुतारी हे चिन्ह दिले आहे. पक्षाच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून ही माहिती देण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षनाव व घड्याळ हे पक्षचिन्ह अजित पवार गटाला देण्याचा निकाल निवडणूक आयोगानं दिला होता. त्यानंतर शरद पवार गटाला नेमकं कोणतं नाव किंवा चिन्ह मिळणार? याची उत्सुकता राजकीय वर्तुळात लागून राहिली होती. त्यासाठी शरद पवार गटाकडून तीन नावांचे पर्याय निवडणूक आयोगाला सादर करण्यात आले होते. त्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार असं नाव देण्यात आलं. परंतु, हे नाव येत्या २८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीपुरतं होतं. त्यामुळे या निवडणुकीकरता पक्षाला चिन्ह देण्यात आलं नव्हतं. त्यामुळे हे प्रकरण शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात नेले होते.

सर्वोच्च न्यायालयात नुकत्याच झालेल्या सुनावणीनुसार शरद पवार गटाला चिन्हासाठी निवडणूक आयोगात अर्ज दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसंच, अर्ज दाखल झाल्यानंतर निवडणूक आयोगाने आठवड्याभराच्या आत चिन्हाबाबत निर्णय देण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार, शरद पवार गटाने तीन पर्याय सुचवले होते. त्यापैकी केंद्रीय निवडणूक आयोगाने तुतारी या चिन्हावर शिक्कामोर्तब केले आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून पुढील आदेश येईपर्यंत तुतारी हे पक्षचिन्ह शरद पवार गटाकडे राहणार आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवरायांच्या शौर्यानं ज्या तुतारीने दिल्लीच्या तख्ताच्याही कानठळ्या बसवल्या होत्या, तीच 'तुतारी' आज निवडणूक चिन्ह. एक तुतारी द्या मज आणुनि फुंकिन मी जी स्वप्राणाने भेदुनि टाकिन सगळी गगने दीर्घ जिच्या त्या किंकाळीने अशी तुतारी द्या मजलागुनी!, अशी केशवसुतांची कविता पक्षाच्या अधिकृत खात्यावरून पोस्ट करण्यात आली आहे. तसंच, महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवरायांच्या शौर्यानं ज्या तुतारीने दिल्लीच्या तख्ताच्याही कानठळ्या बसवल्या होत्या, तीच 'तुतारी' आज निवडणूक चिन्ह म्हणून निश्चित होणं ही 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवार'साठी गौरवास्पद बाब आहे. महाराष्ट्राचं आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांनी, आदरणीय खा. शरदचंद्र पवार साहेबांच्या साथीने दिल्लीच्या तख्ताला हादरवून सोडण्यासाठी हीच 'तुतारी' पुन्हा एकदा रणशिंग फुंकण्याकरिता सज्ज आहे!, असंही पोस्टमध्ये लिहिण्यात आलं आहे.

# मुंबईत काँग्रेसकडून तीन जागांची मागणी

## ठाकरे ज्या जागा सोडणार नाही म्हणतात त्या जागेवरही दावा!

**मुंबई :** लोकसभा निवडणूक अवघ्या काही दिवसांवर आली असतानाच राज्यात महाविकास आघाडी जागावाटप अजूनही रखडलं असल्याचे स्पष्ट झालं आहे. आज (२२ फेब्रुवारी) काँग्रेसची राज्य निवड समितीची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये काँग्रेसकडून मुंबईमध्ये सहापैकी तीन जागांची मागणी करण्यात आली. त्यामुळे उद्धव ठाकरेंकडून ज्या जागांवर दावा करण्यात आला आहे, त्याच जागेवर काँग्रेसकडूनही दावा करण्यात आल्याने आता हा कळीचा मुद्दा राहणार आहे.

२७ फेब्रुवारीच्या बैठकीमध्ये मुंबईमधील बैठकीत काथ्याकूट होण्याची शक्यता आहे. मुंबईमधील दक्षिण मध्य, उत्तर पश्चिम आणि उत्तर मध्य या तीन जागांसाठी काँग्रेस प्रयत्नशील आहे. काँग्रेसने तीन जागा लढवाव्यात आणि ठाकरे गटाने तीन जागा लढाव्यात अशी बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. त्यामुळे आता ज्या मतदारसंघांवर ठाकरे यांनी दावा केला आहे, तेच मतदारसंघ आता सोडणार का? याकडे आता लक्ष लागला आहे.

**उत्तर पश्चिम मतदारसंघ सोडण्यास स्पष्ट नकार**

**दुसरीकडे, उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघ जागा सोडण्यास उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट नकार दिला आहे. उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघ हा खासदार गजानन किर्तीकर यांच्याकडे आहे. गजानन किर्तीकरांनी शिवसेनेतून ही जागा लढवली, पण शिवसेनेत फूट पडल्यानंतर गजानन किर्तीकर यांनी शिंदे गटात प्रवेश केला. ठाकरे गटाकडून २३ जागांवर दावा करण्यात आला असून त्यामध्ये उत्तर पश्चिम मुंबई म्हणजेच गजानन किर्तीकर यांच्या जागेचा देखील समावेश आहे.**

दुसरीकडे, दक्षिण मध्य मुंबईच्या जागेवरुन तिढा निर्माण झाला आहे. ठाकरे गटाकडून या जागेसाठी दावा करण्यात आला आहे. येत्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये ठाकरे गटाकडून अनिल देसाई रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. त्यांना लोकसभेची उमेदवारी देण्याची तयारी सुरु असल्याची माहिती सूत्रांनी दिली. तसेच अनिल देसाई यांना तयारी करण्याबाबत हिरवा कंदील देण्यात आल्याचं देखील सांगण्यात आलं आहे. त्यामुळे काही दिवसांपासून अनिल देसाई हे दक्षिण मध्य मुंबईमधील शाखांना भेटी देणे त्यासोबत बैठका घ्यायला सुरुवात झाली आहे. ठाकरे गटाकडून अनिल देसाई यांना उमेदवारी जाहीर केल्यास शिवसेना खासदार राहुल शेवाळे विरोधात उभे राहू शकतात. याच जागेवर काँग्रेसकडून देखील दावा आहे.

# जिल्ह्यात यंदा ८० हजार हेक्टर क्षेत्रात धानाचे नियोजन

## उन्हाळी हंगामासाठी शेतकरी लागले कामाला

**गोंदिया :** रब्बीचा हंगाम संपला असून, आता उन्हाळ्यासाठी शेतकरी कंबर कसून कामाला लागला आहे. जिल्ह्यात धानाचे सर्वाधिक उत्पादन घेतले जात असल्याने सर्वाधिक क्षेत्र धानाचेच असते व यंदा जिल्ह्यात ८० हजार हेक्टर क्षेत्रात उन्हाळी धानाचे नियोजन करण्यात आले आहे. यातील २१ हजार १०१ हेक्टरमध्ये आतापर्यंत धानाची रोवणी झाली आहे. उन्हाळी धान रोवणीसाठी शेतकरी जोमाने कामाला लागलेला दिसून येत आहे.जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रमुख पीक धान आहे. यामुळेच जिल्ह्यात सर्वाधिक धानशेती केली जात असून, धानाचे भरघोस उत्पादन घेतले जात असल्याने गोंदिया जिल्ह्याला धानाचे कोठार म्हटले जाते. आता रब्बीचा हंगाम संपला आहे. तर मागील वर्षी बरसलेल्या दमदार पावसामुळे पाटबंधारे विभागाकडून उन्हाळीसाठी पाणी दिले जाणार असल्यामुळे शेतकऱ्यांची उन्हाळी धान पीक घेण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. जिल्ह्यात धानाचे सर्वसाधारण क्षेत्र ४३ हजार ११२.६८ हेक्टर असून, मागील वर्षी जिल्ह्यात तब्बल ७६ हजार ६९१ हेक्टरमध्ये शेतकऱ्यांनी धानाची रोवणी केली होती. यामुळे यंदा कृषी विभागाने ८० हजार हेक्टर क्षेत्रात उन्हाळी धानाचे नियोजन केले आहे. दिवाळी आटोपली असून, ग्रामीण भागातील मंडईचा काळही लोटला असल्याने शेतकरी पुन्हा नव्या जोशात उन्हाळी हंगामासाठी सज्ज झाला आहे. हेच कारण आहे की, आता २१ हजार १०१.२६ हेक्टर क्षेत्रात धानाची रोवणी झाली आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत २१ हजार १०१.२६ हेक्टरमध्ये उन्हाळी धानाची रोवणी झाली आहे. यात सडक-अर्जुनी तालुक्यात आतापर्यंत सर्वाधिक सहा हजार ८२० हेक्टरमध्ये रोवणी आटोपली आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर अर्जुनी-मोरगाव तालुका असून, येथे चार हजार ५२३ हेक्टरमध्ये धानाची रोवणी आटोपली आहे.



### ५९८१ हेक्टरमध्ये रोपवाटिका

**- जिल्ह्यात ५९८१.१४ हेक्टर क्षेत्रात रोपवाटिका लावण्यात आल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक एक हजार ३३९.८८ हेक्टर क्षेत्रात अर्जुनी-मोरगाव तालुक्यात रोपवाटिका लावण्यात आल्या आहेत. त्यानंतर सडक-अर्जुनी तालुक्यात एक हजार १०१ हेक्टर क्षेत्रात रोपवाटिका लावण्यात आल्या आहेत. यावरून रोवणी असो वा रोपवाटिका अर्जुनी-मोरगाव व सडक-अर्जुनी तालुकाच आघाडीवर राहतो, असे दिसून येते.जिल्ह्यातील उन्हाळी धान रोवणी क्षेत्र -तालुका- क्षेत्र (हेक्टरमध्ये)गोंदिया- ५६५गोरेगाव- १५०७**

**तिरोडा- १३१६.३६अर्जुनी-मोरगाव- ४५२३**

**देवरी- २१३७.९०आमगाव- २७४०**

**सालेकसा- १४९२सडक-अर्जुनी- ६८२०**

**एकूण- २१,१०१.२६जिल्ह्यातील रोपवाटिकांची स्थितीतालुका- क्षेत्र (हेक्टरमध्ये)गोंदिया- ७८६गोरेगाव- १५०७**

**तिरोडा- १३१६.३६अर्जुनी-मोरगाव- १३३९.८८**

**देवरी- ३७२.९०आमगाव- ७४२.७०**

**सालेकसा- ५५०सडक-अर्जुनी- ११०१**

**एकूण- ५९८१.१४**

# मविआला ४२ जागांवर विजय मिळेल, भाजपा पराभवाचा पाया महाराष्ट्रच रचेल

## काँग्रेसचा निर्धार

**मुंबई :** देशात परिवर्तनाचे वारे आहेत. भाजपाच्या सरकारविरोधात प्रचंड चीड आहे. काँग्रेस पक्षावर जनतेचा विश्वास वाढलेला आहे, असा दावा करण्यात आला आहे.

लोकसभेच्या निवडणुकीसाठी प्रदेश काँग्रेसची तयारी झाली असून मित्रपक्षांबरोबरचे जागा वाटप, संघटनेची तयारी, प्रचारातील मुद्दे यांवर राज्य निवड मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. महाविकास आघाडीची जागा वाटपासंदर्भातील चर्चा अंतिम टप्प्यात आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी पक्ष, शेकाप, माकपा, वंचित बहुजन आघाडीसह एकत्रितपणे निवडणुक लढवण्याची तयारी आहे. भारतीय जनता पक्ष विरुद्ध महाविकास आघाडी असा सरळ सामना असून मविआ लोकसभेच्या ४२ जागांवर विजय संपादन करेल, असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे.

**भाजपा पराभवाचा पाया महाराष्ट्रच रचणार**

**महाविकास आघाडी मजबूत असून केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या सरकारच्या पराभवाचा पाया महाराष्ट्रच रचणार आहे.**

**दिल्लीच्या सीमेवर सुरु असलेल्या शेतकरी आंदोलनावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, नरेंद्र मोदींचे हुकुमशाही सरकार शेतकऱ्यांना शत्रू, आ-तंकवादी समजून त्यांच्यावर अंधाधुंद गोळीबार करत आहेत. दिल्लीच्या खनौरी सीमेवर पोलिसांच्या गोळीबारात एका तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाला असून तीन ते चार शेतकरी गंभीर जखमी झाले आहेत. देशाच्या पंतप्रधानाने संसदेत शेतकऱ्यांना खलिस्तानी, नक्षलवादी, आंदोलनजीवी म्हणून अपमान केला. शेतकरी विरोधी, निर्दयी मोदी सरकारचा काँग्रेस पक्ष तीव्र धिक्कार करत आहे. भाजपा सरकारला याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा नाना पटोले यांनी दिला.**

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, बैठकीत जवळपास अडीच तास सर्व मुद्द्यांवर चर्चा झाली. ज्या मतदारसंघात ज्या पक्षाची संघटनात्मक ताकद आहे, त्या मतदारसंघात त्या पक्षाचा उमेदवार असेल,जागा वाटप हे मेरिटनुसारच होणार आहे, त्यात कोणतेही मतभेद नाहीत.

देशातील वातावरण इंडिया आघाडीसाठी अनुकुल असून परिवर्तनाचे वारे वाहत आहेत. शेतकरीविरोधी, तरुणांचा अपेक्षाभंग करणारे, महागाई, बेरोजगारी नियंत्रित करु न शकलेल्या भाजपाच्या नरेंद्र मोदी सरकारविरोधात जनतेत प्रचंड चीड आहे, अशी टीका करत, काँग्रेस पक्षावर जनतेचा विश्वास वाढलेला आहे, असे नाना पटोले यांनी सांगितले.

दरम्यान, निवडणुका आल्यामुळे विरोधी पक्षांच्या लोकांवर सरकारी यंत्रणांच्या माध्यमातून धाडी टाकल्या जात आहेत. परंतु भाजपाच्या एकाही भ्रष्ट नेत्यावर कारवाई केली जात नाही. भ्रष्टाचारमुक्त भारत करण्याची वल्गना भारतीय जनता पक्षाने केली होती. परंतु ज्या लोकांवर भाजपाने भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांनाच भाजपात घेऊन भ्रष्टाचारयुक्त भाजपा केला आहे.


अजित पवार यांच्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या घोटळ्याचा आरोप केला त्यांच्यावर छापे टाकले का? उलट त्यांना सत्तेत घेऊन उपमुख्यमंत्री केले. आदर्श घोटाळ्याचा उल्लेख पंतप्रधान मोदींनी संसदेत केला व त्यानंतर अशोक चव्हाणांना भाजपात घेऊन राज्यसभा खासदार केले.

भाजपाने भ्रष्टाचारी लोकांनी सुरक्षाकवच दिले आहे. भारतीय जनता पक्षाच्या ३०३ खासदारांमध्ये विरोधी पक्षातातील ज्या १६५ जण आहेत तर काँग्रेसचे ६७ जण आहेत, ज्यांच्यावर भाजपने भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. हे काय भ्रष्टाचारमुक्त भारत करणार? असा सवाल नाना पटोले यांनी केला आहे.

# प्राणप्रतिष्ठेला महिना पूर्ण अयोध्येत भाविकांचा महासागर

## ३० दिवसांत ६२ लाख जणांचे रामदर्शन

**अयोध्या :** बालरुपातील रामलला दर्शन घेण्यासाठी अयोध्येत लाखोंच्या संख्येने भाविक येत आहेत. दररोज लाखो भक्त रामदर्शन घेत आहेत. तर दानधर्महही मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेल्याराम मंदिरप्राणप्रतिष्ठा सोहळ्याला आता जवळपास एक महिना झाला आहे. गेल्या महिन्याभरात सुमारे ६२ लाख भाविकांनी अयोध्येत येऊन रामदर्शन घेतल्याचे सांगितले जात आहे.





अयोध्यारामनगरीत ही भक्ती, ज्ञान आणि कर्माचा त्रिवेणी संगम पाहायला मिळत आहे. भव्य आणि दिव्यराम मंदिरातश्रीरामांचे दर्शन घेण्यासाठी भक्तांचा महासागर लोटत आहे. आस्था ट्रेनमधून दररोज जवळपास १० ते १५ हजार भाविक अयोध्येत पोहोचत आहेत. भाविकांना अनेक किलोमीटर पायी प्रवास करत राम मंदिराकडे जावे लागत आहे. अजूनही अनेक सुविधांची अभाव आहे. असे असूनही भाविकांचा रामदर्शनाचा उत्साह तसूभरही कमी होताना दिसत नाही.भाविकांमध्ये अभूतपूर्व उत्साह आहेअयोध्येत येणाऱ्या भाविकांचा उत्साह अगदी पाहण्यासारखा आहे.

गर्दी कमी होऊन मग रामदर्शनासाठी जाऊ, अशी वाट भाविक पाहताना दिसत नाहीत. रामललाचे दर्शन घेण्यासाठी देश-विदेशातून भाविक येत आहेत. सर्वांना रामदर्शनाची उत्सुकता आहे. अयोध्येतील राम मंदिर इतर मंदिरांच्या तुलनेत कसे आहे, हे पाहण्यासाठीही लोक दर्शनासाठी येत आहेत. भाविकांना दोन ते तीन किलोमीटर पायी चालत यावे लागत आहे. असे असले तरी त्यांच्या चेहऱ्यावर थकवा दिसत नाही. दर्शन घेताच चेहऱ्यावरील आनंद अवर्णनीय असतो. रामललाचे दर्शन घेतल्यानंतर ज्येष्ठांच्या डोळ्यात पाणी तरळते. आनंदाश्रूंसह ते बाहेर येतात. भाविकांमध्ये अभूतपूर्व उत्साह आहे, अशी प्रतिक्रिया श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सदस्य डॉ.अनिल मिश्रा यांनी दिली आहे.

# कांदा निर्यातीचा क्रूर विनोद; प्रत्यक्षात निर्यातीची अधिसूचना निघालीच नाही



८ डिसेंबरपासून लादण्यात आलेल्याकांदानिर्यातबंदीमुळे भाव कोसळले, शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघेना, व्यापाऱ्यांचेही नुकसान झाले, असा आक्रोश वाढला. परिणामी, केंद्र सरकारला निर्यातबंदी मागे घेण्याबद्दल विचार करावा लागला. जणू मायबाप सरकारला शेतकऱ्यांची कणव आली आणि निर्यातबंदी अंशत: मागे घेण्यात आली, असे दोन दिवसांपूर्वी सांगण्यात आले. प्रत्यक्षात अधिसूचना निघालीच नाही. रविवार आल्याने ती सोमवारी निघेल या आशेने बाजारातील कांद्याचे दर आठशे ते हजार रुपयांनी वधारले. खरीप कांद्याला हंगामाच्या शेवटी का होईना थोडा भाव मिळेल, असे चित्र तयार झाले. तथापि, मंगळवारी सरकारने अधिकृतपणे जाहीर केले, की निर्यातबंदी मागे घेण्यात आलेली नाही. केंद्र सरकारच्या ग्राहक कल्याण विभागाचे सचिव रोहित कुमार यांनी मंगळवारी जाहीर केले, ३१ मार्चपर्यंत निर्यातबंदी कायम राहील. कारण ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देताना देशांतर्गत बाजारात कांद्याचे दर वाढू नयेत यासाठी निर्यातबंदी आवश्यक आहे. ही मुदत संपेल तेव्हा लोकसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचलेला असेल. ती वेळ उन्हाळीकांदाबाजारात येण्याची. परंतु, महाराष्ट्र, मध्य प्रदेश व गुजरातमध्ये यंदा रब्बी कांद्याची लागवड घटली आहे. त्यामुळे ३१ मार्चनंतर निर्यातबंदी उठेलच याची खात्री नाही. कांदा निर्यातबंदीबाबत मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत चर्चा झाली आणि निवडक देशांना तीन लाख टन, तर बांगलादेशात पन्नास हजार टन कांदा निर्यात करण्याचे ठरले.त्या बैठकीचा व निर्णयाचा हवाला देऊन कांदा उत्पादक टापूतील खासदारांनी अंशत: का होईना निर्यातबंदी उठविण्यात आल्याचे जाहीर केले.

भाजपच्या कार्यसंस्कृतीनुसार राज्यातील नेत्यांनी निर्णय नेमका काय झाला याची शहानिशा न करता लगोलग केंद्र सरकारचे आभार मानले. आभार प्रदर्शनाची होर्डिंग्जही लागली. या घोषणेचा परिणाम कांद्याच्या घाऊक बाजारपेठेवर झाला. लासलगाव या देशातल्या सर्वांत मोठ्या बाजारपेठेत शनिवारच्या तुलनेत कांद्याचे क्विंटलचे भाव चाळीस टक्क्यांनी वाढून दोन हजारांच्या घरात पोहोचले. पण, निर्यातबंदी उठविण्याचा नव्हे तर निवडक मित्रराष्ट्रांना कांदा निर्यात करण्याचा निर्णय झाला होता. त्यासंदर्भातील निर्णय मंत्रिमंडळ उपसमिती घेणार आहे. आता तत्त्वत: गुजरातमध्ये पिकणाऱ्या पांढऱ्या कांद्याच्या निर्यातीला ही समिती अनुकूल आहे. महाराष्ट्रात पिकतो तो लाल कांदा. यातच सारे काही आले. हा एकप्रकारे कांदा उत्पादक शेतकऱ्यांसोबत केलेला क्रूर विनोद किंवा ब्लॅक कॉमेडी आहे. असा विनोद सरकार दरवर्षीच करीत असते. सप्टेंबर- ऑक्टोबरमध्ये खरिपाचा कांदा बाजारात येण्याच्या वेळी आणि नंतर मार्च-एप्रिलमध्ये रब्बी किंवा उन्हाळी कांदा बाजारात येण्याच्या वेळेस थोडासा तुटवडा निर्माण होतो. तो झाला की ग्राहकांना स्वस्तात कांदा देण्याच्या नावाखाली सरकार कारवाईसाठी सरसावते. कधी किमान निर्यातमूल्य वाढविणे, कधी निर्यातबंदी असा वरवंटा कांदा उत्पादकांवर फिरविला जातो. शेतकरी व व्यापाऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. आताच्या निर्यातबंदीमुळे अडीच महिन्यांमध्ये शेतकरी व व्यापाऱ्यांचे किमान दोन हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले. वर्षानुवर्षे हेच सुरू आहे. किरकोळ बाजारातील तुटवड्याचा आगाऊ अंदाज बांधून तसा साठा करून ठेवणे, त्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान वापरणे आणि सरकारने तोटा सोसून ग्राहकांना किफायतशीर दरात कांदा उपलब्ध करणे सहज शक्य आहे; पण शेतकऱ्याचे उपद्रवमूल्य दखल घेण्याइतके नसल्याने हे उपाय केले जात नाहीत आणि हे केवळ कांद्याबद्दलच होते असेही नाही. सध्या केंद्र व राज्यात सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे 'गाव चलो' नावाचे प्रचार अभियान सुरू आहे. त्यात म्हणे गावागावांत जाणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांना गावकरी कापूस व सोयाबीनचे भाव कोसळल्याबद्दल धारेवर धरीत आहेत. निवडणूक तोंडावर असल्याने ही नाराजी परवडणारी नाही, हे ओळखून तसे वरिष्ठ नेतृत्वाला कळविण्यात आले आहे. कांद्याच्या दराचीही अशीच नाराजी आहे. परंतु, तिची कापूस व सोयाबीनसारखी दखल घेतली जाणार नाही किंवा घेत नाही. कारण, शहरांमधील मध्यमवर्गीय मतदार हा कांद्याचा थेट लाभार्थी आहे आणि त्याची संख्या कांदा उत्पादकांपेक्षा कितीतरी अधिक आहे. म्हणून त्याला खुश ठेवण्यासाठी अल्पसंख्येतील शेतकरी नाराज झाले तरी निवडणुकीचा विचार करता परवडणारे आहे. सरकारने मतांची बेगमी करताना ग्राहकांना गोंजारावे; पण निर्यातबंदी उठविण्याच्या वावड्या उठवून कांदा उत्पादकांच्या निर्यातबंदीच्या जखमांवर मीठ चोळू नये.

## शिरोळ स्टेट बँक शाखेला ४० लाखाची फसवणूक

**शिरोळ :** सांगली जिल्हयातील म्हैशाळ ( ता मिरज ) येथील एका ठकसेनाने स्वतःची मिळकत आहे असे दाखवून शिरोळ येथील स्टेट बँकेच्या शाखेला तारण देऊन चाळीस ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत शिरोळ स्टेट बँक शाखेचे शाखा अधिकारी सचिन कुलकर्णी रा. विश्रामबाग सांगली यांनी शिरोळ पोलिसात फिर्याद दिली आहे . दरम्यान शिरोळ पोलिसांनी संशयित आरोपी अशोक मारुती कोरवी याला अटक केली आहे

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की , संशयित आरोपी अशोक मारुती कोरवी याने म्हैशाळ येथील सिटी सर्व्हे नंबर २७३ मिळकत ही स्वतःची आहे असे बँकेला भासवले होते. त्याने सदरची मिळकत स्वतःच्या मालकीची नसताना शिरोळ स्टेट बँक शाखेला तारण देऊन ३९ लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे.



सदर कर्जाची रक्कम २५ जुलै २०१९ रोजी बँकेच्या खात्यामधून उचलले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

अशोक कोरवी यांनी कर्जाची उचल केल्यानंतर आज अखेर कर्ज व त्यावरील व्याज रकमेची बँकेला परतफेड केलेली नाही . यामुळे सदरचे कर्ज थकीत झाले आहे .

या थकबाकीच्या रक्कम वसुलीबाबत शिरोळ स्टेट बँके शाखेने संबंधित कर्जदाराची पडताळणी केली असता संशयित आरोपी अशोक कोरवी यांनी बँकेची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे बुधवारी शिरोळ पोलिसात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, ठकसेन संशयित आरोपी कोरवी याने शिरोळ तालुक्यातील पूर्व भागातील कृष्णा नदीकाठी असलेल्या एका नामांकित पतसंस्थेलाही सदरची मिळकत तारण दाखवून कर्जापोटी लाखो रुपये उचलल्याची माहिती पुढे येत आहे . त्यामुळे सदर संस्था आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता असून पोलिसांनी त्या नामांकित संस्थेबरोबरच अन्य काही संस्थेमध्ये अशा प्रकारच्या फसवणूकीचा प्रकार झाला आहे का ? या दिशेने तपास सुरू केला आहे.

दरम्यान कोल्हापूर जिल्हा बरोबरच सांगली जिल्ह्यातील काही संस्थेत संशयित आरोपी कोरवी यांनी व्यक्तिगत तसेच सहकारी संस्थांना फसवणूक केल्याची चर्चा सुरू आहे.अधिक तपास पोलीस निरीक्षक शिवाजीराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार मुल्ला करीत आहे.

## कोयना धरणाचे विमोचक उघडून कोयना नदीमध्ये ५०० क्युसेक्स विसर्ग



**सांगली :** सांगली जिल्ह्यात पाण्याची कमतरता जाणवत असून आज मंगळवारी दि. २० फेब्रुवारी रोजी सांगली पाटबंधारे विभागाकडून सिंचनाची मागणी वाढल्यामुळे आज दुपारी १२:०० वा कोयना धरणाचे विमोचक उघडून कोयना नदीमध्ये ५०० क्युसेक्स विसर्ग सोडण्यात आला आहे.कोयना धरण पायथा विद्युत गृहाचे दोन्ही युनिट सुरू असून त्याद्वारे २१०० क्युसेक्स विसर्ग सुरू आहे. सद्यस्थितीत कोयना नदीमध्ये एकूण २६०० क्युसेक्स विसर्ग सोडण्यात येत आहे. धरणाची पाणीपातळी २१२७'०१ फुट (६४८.३३५ मीटर) असुन पाणीसाठा : ६७.४९ टीएमसी (६४.१२%) आहे.

### प्रितम मुंडे मैदानात उतरणार की नाही, बीड लोकसभा कोण लढवणार?

## पंकजा म्हणाल्या, दिल्लीतून उमेदवार ठरेल

**बीड :** आतापर्यंत बीड लोकसभा ही प्रितम मुंडे याच लढवतील असं स्पष्टपणे सांगणाऱ्या पंकजा मुंडेंनी आता याबाबतचा निर्णय भाजप पक्षश्रेष्ठी घेतील असं वक्तव्य केलं आहे. पंकजा मुंडे यांनीच निवडणूक लढवावी अशी भाजप नेतृत्वाची इच्छा असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्यावर पंकजा मुंडे यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

पंकजा मुंडे यांच्या या ताज्या वक्तव्यानंतर आधी बीडची लोकसभा ही प्रितम मुंडेच लढतील आणि आपण राज्याच्या राजकारणात सक्रिय असून असं म्हणणाऱ्या पंकजा मुंडे यांनी आपली भूमिका बदलली का असा प्रश्न विचारला जात आहे.



पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत आष्टीमध्ये बूथप्रमुखांच्या संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीनंतर पंकजा मुंडे यांनी बीड लोकसभा निवडणुकीचा उमेदवार पक्षश्रेष्ठी ठरवतील असं वक्तव्य केलं. तसेच कोणत्याही आरक्षणाच्या आंदोलनाचा निवडणुकीवर धोकादायक परिणाम होणार नसल्याचं पंकजा मुडे म्हणाल्या.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सध्या बूथ रचना केली जात आहे आणि या कामाला कार्यकर्त्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे पंकजा मुंडे म्हणाल्या. २०१४ आणि १९ मध्ये याच कार्यकर्त्यांनी माझ्या बाजूने चांगलं काम केलं होतं, त्यामुळे उमेदवार कोण असेल हे येणाऱ्या काळात निश्चित होईल असं त्या म्हणाल्या.

आरक्षणाच्या आंदोलनाचा निवडणुकांवर परिणाम नाही

राज्यामध्ये सध्या मराठा आरक्षण ओबीसी आरक्षण आणि धनगर आरक्षणाचा प्रश्न पेटलेला आहे आणि याचा येणाऱ्या लोकसभा निवडणुकीवर तेवढ्या प्रमाणात धोकादायक परिणाम होणार नाही असं पंकजा मुंडे म्हणाल्या. राज्य सरकारने मराठा समाजाला जे आरक्षण दिलं आहे त्या आरक्षणाचा मराठा समाजाने विरोध केला आहे. यावर बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, मराठा समाजाने ठरवावं आरक्षण हवे आहे की नाही? यावर अनेकदा मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे असं म्हणत त्यांनी यावर भाष्य करण टाळले.

येणारा काळ महिलांचा, महिला स्पष्ट आणि सत्याचे राजकारण करतील

राजकारणात येणाऱ्या महिलांसाठी येणारा काळ चांगला आहे, कारण येत्या काळात महिलाच या स्पष्ट आणि सत्याचं राजकारण करतील असे पंकजा मुंडे म्हणाल्या. तर येणाऱ्या काळात एकट्याची ताकद जगाला दाखवून द्यावी लागेल अस देखील पंकजा मुंडे म्हणाल्या.

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने स्वराज्य सप्ताह निमित्त भव्य मोटरसायकल रॅली

**हिंगोली :** राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने स्वराज्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते यानिमित्त हिंगोली शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त भव्य मोटर सायकल रॅलीचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बिडी बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रवादीचे युवक शहराध्यक्ष स्वप्नील इंगळे यांच्या नेतृत्वात करण्यात आले.

यावेळी शहरातील मुख्य मार्गावर रॅली काढून शिवाजी महाराज की जय अशा घोषणा देण्यात आल्या.

या मोटरसायकल रॅलीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे हिंगोली शहराध्यक्ष केशवजी दुबे, सुरज वडकुते, सुजय देशमुख विशाल काळे बबलू सय्यद करण कल्याणकर नागेश आप्पा यांच्यासह मोठ्या संख्येने राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता.

## कु.साक्षी चव्हाणला डिसीएम सोसायटी संस्थेकडून सन्मानित



**हडपसर :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमधील नेतृत्व कौशल्याचा विकास करण्याच्या उद्देशाने पाच दिवशीय राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबिर प्रेरणांचे आयोजन महाराष्ट्र राज्य व उच्च तंत्र शिक्षण विभाग मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि एस एस टी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नेरळ मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते.

अहिल्या आश्रम नाना पेठ येथील डीसीएम सोसायटी ऑफ इंडिया पुणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य व महर्षी विठ्ठल शिंदे कला महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेची विद्यार्थिनी कु.साक्षी चव्हाण हिने राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबिर प्रेरणांचे या कार्यक्रमांमध्ये आपला सहभाग नोंदवून उत्कृष्ट स्वयंसेवक विद्यार्थिनी म्हणून नेतृत्व केल्याने आणि तिला सन्मान मिळाल्याने डिसीएम सोसायटी ऑफ इंडिया संस्थेचे अध्यक्ष व जनसेक्रटरी विशाल शेवाळे यांच्या हस्ते साक्षी चव्हाण हिचा स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

साक्षी चव्हाण हिने या अगोदर अनेक वेगवेगळ्या विद्यापीठ स्तरीय, महाविद्यालयीन स्तरीय शिबिरामध्ये आपला सहभाग नोंदवून संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे तसेच उत्कृष्ट खेळाडू म्हणून ही वेगवेगळ्या खेळांमध्ये तिने यश संपादन केलेले आहे महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा.प्रसाद कर्डिले यांनी मार्गदर्शन केले आहे.

यावेळी डीसीएम सोसायटी ऑफ इंडिया पुणे,संस्थेचे अध्यक्ष डी.टी रजपूत ,जनरल सेक्रेटरी विशाल शेवाळे , काजल शेवाळे,मुख्याध्यापिका शिल्पा भोसले,संस्था पर्यवेक्षक वरूण भोसले,प्राचार्य भारती सहस्रबुद्धे,उप प्राचार्य डॉ.नरेश पोटे,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण कांबळे,मुख्याध्यापक कल्याण बर्डे, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक विद्यार्थिनी साक्षी चव्हाण हिचे डॉ.जे.के म्हस्के,डॉ.तेजपाल कांबळे,प्रा.रणजीत देशमुख, किशोर भुजबळ, प्राध्यापक,शिक्षकेतर-कर्मचारी,विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.महाविद्यालयातील हुशार,कष्टाळू,प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या नेहमीच पाठीशी असणारे जनरल सेक्रेटरी विशाल शेवाळे यांनी साक्षी चव्हाण या विद्यार्थिनीला रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# रामटेकडी इंडस्ट्रीयलमधील हिलसाईड सोसायटी समोरील रस्ता सहा महिन्यापासून रखडला

### रस्ता अर्धवट स्थितीत खोदून ठेवल्याने नागरिक त्रस्त

**हडपसर :** रामटेकडी इंडस्ट्रीयल मधील हिलसाईड सोसायटी समोरील रस्ता पाचसहा महिने खोदून ठेवण्यात आला असून हिलसाईड सोसायटी गेटसमोरच रस्ता उखडून अर्धवट स्थितीत उखडून ठेवल्याने येथील सोसायटी नागरीकांची तसेच रामटेकडी इंडस्ट्रीयल मधील येणा-या जाणा-या नागरीकांना तसेच वाहनधारकांना रस्ता खोदाईचा त्रास सहन करावा लागत आहे. रस्ता क्रॉस करताना नागरीकांना अडचण निर्माण होत आहे,मुख्य रस्ता पाचसहा महिने झाले खोदाई करुन ठेकेदार गायब झाल्याने रस्ता तसाच अर्धवट स्थितीत पडून आहे, रस्त्याला मातीचा ढिग



टाकून रस्ता अडवला आहे तर रस्ता मध्येच अर्धा खोदलेला असल्याने त्यास बॅरिकेट्स लावण्यात आलेले नसल्याने व रात्रीच्या वेळी रामटेकडी इंडस्ट्रीयल रस्त्यावर लाईट नसल्याने अंधारात दुचाकी वाहाने घसरून तसेच सोसायटी मधील वृध्द नागरीक घसरून अपघात घडत असल्याचे प्रकार रामटेकडी इंडस्ट्रीयल मधील रस्त्यावर पहायला मिळत आहे.रस्ता लवकर पूर्ण करण्यात यावा अशी मागणी हिलसाईड सोसायटी मधील नागरिक आनंद उत्तरकर , धर्मेंद्र कुमार,जर्जर कबिरा ,मुकेश मखिजा,अनुगृह भाटिया ,आर्या कवितके, रितिका मखिजा ,यादव, देशमुख आदी नागरीकांनी केली आहे.

पथविभाग कनिष्ठ अभियंता ऋषिकेश सुर्यवंशी यांच्याशी अर्धवट रस्त्याविषयी माहिती विचारली असता दोनचार दिवसात काम मार्गी लागेल असे सांगितले.

१० सप्टेंबर २०२३ ला सुरू झालेल्या रस्त्याच्या काम हे सप्टेंबर २०२३ अखेर पूर्ण होणे अपेक्षित होते. ते अद्याप अर्धेही झालेले नाही.१०० मीटरचा रस्ता सहा महिन्यांत अर्धाही झालेला नाही. मला वाटते की हे गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदले गेले पाहिजे. वाहने रस्ता ओलांडू शकत नसल्याने उद्योगाचे नुकसान होत आहे. हिलसाइड रहिवाशी नागरीकांची निराशा आहे , रहिवासी आणि उद्योजक त्रस्त आहेत,रस्त्याचे काम पूर्ण होईल तेंव्हा उद्घाटनास बँडसह चीअर लीडर्सला बोलावण्याचा विचार करत आहोत.ऐवढा त्रास पुणे मनपाने नागरीकांना दिला आहे.

**जमिनीवरचे वास्तव आम्ही ज्या वेदनांमधून जात आहोत ते सांगायला नको,पुणे मनपा किती तत्परतेने कामे मार्गी लावते, आता आमचा अंत मनपा कुठपर्यंत पहाणार आहे ,लवकर रस्ता पुर्ण व्हावा.**
**- आनंद उत्तरकर**

## शेनवडी येथे दि. २३ व २४ रोजी विविध कार्यक्रम

**वडूज :** शेनवडी (ता. खटाव )येथील तुळजाभवानी उद्योग समुहाचे आधारवड वै. मारुती ज्ञानू पाटील यांचे द्वितीय पुण्यस्मरण व आदर्श माता वै. वैजयंता मारुती पाटील यांच्या स्मरणार्थ शुक्रवार दि. २३ व शनिवार दि. २४ मार्च रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती मार्केट कमिटीचे माजी सभापती सी. एम. पाटील, मुबई जिल्हा बँकेचे निवृत्त व्यवस्थापक एल. एम. पाटील यांनी दिली.

यामध्ये दि. २३ रोजी सकाळी ८ वाजता प्रतिमा पुजन व ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या ९ व्या व १२ व्या अध्यायाचे सामुदायिक वाचन, सायंकाळी ६ वाजता हरिपाठ व रात्री ८ ते १० या वेळेत ह.भ.प. विजय शिंदे लोणीकर यांचे किर्तन होणार आहे. दि. २४ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. ज्योतिताई मतकर आळंदीकर यांचे फुलांचे किर्तन होणार आहे. दुपारी १२ वा. १० मि. प्रतिमेवर पुष्पवृष्टी होणार आहे. यावेळी अध्यात्म क्षेत्रातील वारकरी तसेच जेष्ठ नागरीक, जेष्ठ मातांचा सन्मान व अन्य सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास ग्रामस्थ, परिसरातील भाविक तसेच हितचिंतकांनी उपस्थित रहावे असे आवाहन सरपंच ज्ञानेश्वर पाटील, अरविंद पाटील, सुर्यकांत पाटील, सागर पाटील, आकाश पाटील व संयोजकांनी केले आहे.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२१, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६१०१०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# रसिकांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या 'अशोक सराफ 'ला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महाराष्ट्र भूषण



**मुंबई :** मालिका असो, सिनेमा असो किंवा नाटक ज्यांनी प्रेक्षकांच्या मनावर कायम अधिराज्य गाजवलं असे ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. 'अशी ही बनवाबनवी', 'धूमधडाका', 'आम्ही सातपुते' ते नुकताच प्रदर्शित झालेला 'वेड' अशा असंख्य गाजलेल्या चित्रपटांमध्ये त्यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. त्यांना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी खास उपस्थिती लावली होती. याशिवाय राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री सुधीर मुनगंटीवार देखील यावेळी उपस्थित होते.

फक्त मराठी चित्रपटांमध्येच नव्हे तर बॉलीवूडमध्येही आपल्या अभिनयाची छाप पाडत अशोक सराफ यांनी सर्वांनाच आपल्या कामाची दखल घ्यायला लावली. मराठी चित्रपटांची धुरा एकेकाळी ज्या निवडक कलाकारांच्या खांद्यावर होती त्यातलं अशोक सराफ हे खमकं नाव. रंगभूमी, मालिका किंवा चित्रपट असो प्रत्येक ठिकाणी त्यांच्या अभिनयाचं नाणं खणखणीत वाजलं.

गुरुवारी (२२ फेब्रुवारी २०२३) रोजी महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना तर मानाचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर यांना प्रदान करण्यात आला आहे. मुंबईतील वरळी येथे पार पडलेल्या ५७ व्या राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

अशोक सराफ यांनी मराठीसह बॉलीवूडमध्येही आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. त्यांच्या अभिनयातून प्रेक्षकांना केवळ विनोदीचं नव्हे तर गंभीर भूमिका ते खलनायक अशा अभिनयाच्या विविध बहुरुपी छटा आपल्याला पाहायला मिळाल्या. अशोक सराफ यांना २०२३चा मानाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आल्यावर सध्या सर्व स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांसह कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळण्याआधी अशोक सराफ माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले होते, या क्षणाला मला नंबर १ झाल्यासारखं वाटतंय. आपल्या कार्यभूमीत असं कौतुक होणं ही प्रत्येकासाठीच खूप मोठी गोष्ट आहे. माझ्या आजच्या लूकचं पूर्ण श्रेय निवेदिताचं आहे. माझ्यासाठी हा खूप मोठा प्रसंग आहे. माझ्यासाठी हा खूप मोठा सत्कार आहे असं मी समजतो.

# अजितदादांपूर्वी जयंत पाटलांना फडणवीसांकडून उपमुख्यमंत्री पदाची ऑफर

## जयंत पाटलांच्या विश्वासू सहकाऱ्याचा गौप्यस्फोट!

**सांगली :** अजित पवारांच्या आधी जयंत पाटील यांना भाजपकडून उपमुख्यमंत्री पदाची ऑफर देत भाजपत येण्याची विनंती करण्यात आली होती, असा गौप्यस्फोट जयंत पाटील यांचे विश्वासू सहकारी व राजारामबापू साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष पी.आर. पाटील यांनी केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही ऑफर दिली होती, असा दावाही पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यासोबत बोलताना केला. दीड वर्षापूर्वी फडणवीस यांनी जयंत पाटलांना ही ऑफर दिली होती आणि या ऑफरबाबत खुद्द जयंत पाटलांनी आपल्यासह सहकाऱ्याशी चर्चा देखील केली होती, असेही ते म्हणाले.

सुजय विखेंच्या वक्तव्याने राजकीय चर्चांना उधाण

एका बाजूने जयंत पाटील यांच्या विश्वासू सहकाऱ्याने केलेल्या दाव्यानंतर खासदार सुजय विखे-पाटील यांनीही केलेल्या वक्तव्याने भूवया उंचावल्या आहेत. जयंत पाटील हेच शरद पवारांसोबत किती दिवस थांबणार आहेत, ते विचारुन घ्या. नाहीतर शेवटचा डाव जयंत पाटीलच टाकायचे, अशी टिप्पणी सुजय विखे यांनी केली. काही दिवसांपूर्वीच मिलिंद देवरा, बाबा सिद्दीकी आणि अशोक चव्हाण या तीन नेत्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत महायुतीमध्ये प्रवेश केल्याने राजकारणात एकच खळबळ उडाली होती. यामुळे उडालेला धुरळा खाली बसला नाही तोच शरद पवार यांच्या जवळचा नेता भाजपमध्ये जाणार, अशी नवी चर्चा सुरु झाली होती. या चर्चेचा रोख जयंत पाटील यांच्या दिशेने असल्याचे सांगितले जाते.

परंतु, शरद पवार गटाकडून या वृत्ताचा इन्कार करण्यात आला होता. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम पसरवण्यासाठी ही बातमी पेरण्यात आल्याचे सांगण्यात आले. तरीही जयंत पाटील आणि त्यांचा मुलगा भाजपमध्ये जाणार, ही चर्चा काही थांबलेली नाही. शरद पवार यांचा राष्ट्रवादी गट हा काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. यावर भाजप खासदार सुजय विखे यांनी आता काँग्रेस पक्षच काही दिवसांनी संपुष्टात येणार असल्याचे म्हटले.

### शरद पवारांसोबत राहण्याचा निर्धार

**मात्र, जयंत पाटलांनी शरद पवारांसोबत राहण्याचा निर्धार करत फडणवीस यांची ऑफर स्वीकारली नाही,असेही पी आर पाटील म्हणाले. जयंत पाटलांच्या बाबतीत सुरू असणाऱ्या अफवा असून त्यावर कोणी विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले. सांगलीच्या कुरळपमध्ये एका कार्यक्रमात ते बोलत होते. जयंत पाटील यांच्या भाजपत जाण्याची चर्चा सुरू झाल्यावर जयंत पाटलांनी आपण भाजपात जाणार नसल्याचे स्पष्टीकरण दिलं आहे. त्यामुळे जयंत पाटलांच्या भाजप प्रवेशावर तुर्त पडदा पडलेला असताना आता त्यांचेच विश्वासू सहकाऱ्यांनी केलेल्या गौप्यस्फोटामुळे जयंत पाटलांशी भाजपशी चर्चा झाल्याचे समोर आले आहे.**

# साताऱ्यात जाणता राजा महानाट्य साठी प्रेक्षक वर्गाचा उदंड प्रतिसाद

**सातारा :** सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई व सातारा जिल्हा प्रशासन यांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान पुणे, निर्मित पद्मविभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे लिखित दिग्दर्शित जाणता राजा महानाट्य साताऱ्यात होत आहे. या महानाट्याला उदंड प्रतिसाद लाभत आहे.

सातारा जिल्हा परिषदेच्या मैदानावर दिनांक २३,२४,२५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजता जाणता राजा हे महानाट्य सादर करण्यात येणार आहे. एक प्रवेश पत्रिकेवर एकाच व्यक्तीला प्रवेश मिळेल प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य या पद्धतीने प्रवेश विनामूल्य आहे. या प्रवेशासाठी सातारा जिल्हाधिकारी कार्यालय, पंचायत समिती सातारा या ठिकाणी विनाशुल्क प्रवेश पत्रिका म्हणजेच पासेसची सोय करण्यात आलेली आहे.

सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये महसूल विभागाच्या नायब तहसीलदार श्रीमती कदम मॅडम व सातारा जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी हे प्रवेश पत्रिका वाटप करण्याचे काम करत आहेत.

आज गुरुवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी सकाळपासून विनाशुल्क प्रवेश पत्रिका घेण्यासाठी सातारकरांनी तसेच शासकीय कर्मचारी, पत्रकार व शिवप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. प्रत्येकांना अगदी शांततेत व रांगेत विनाशुल्क प्रवेश पत्रिका देण्यात आलेले आहेत .हे महानाट्य जाणता राजा पाह ण्यासाठी सातारा जिल्ह्यातील माण, खटाव, कोरेगाव, सातारा, वाई, महाबळेश्वर, खंडाळा, पाटण, जावळी, कराड आदी तालुक्यातून लोक येणार आहेत. सातारा शहरातून व लांबून येणाऱ्या शिवप्रेमींसाठी सातारा सैनिक स्कूल मैदान या ठिकाणी वाहन तळे उभारण्यात आलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची माहिती शिवप्रेमींना आहेच. परंतु या महानाट्याच्या माध्यमातून जिवंत देखावा व प्रसंग पाहण्यास मिळणार आहे. याचे सर्वाधिक आकर्षण तरुण पिढीला निर्माण झालेले आहे. दरम्यान, या महानाट्यामुळे संपूर्ण कुटुंब कार्यक्रमाला येणार असल्याने सातारा शहरातील व्यवसायिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# औरवाड येथील नवविवाहित कोले दाम्पत्यांनी घातला आदर्श

**कुरुंदवाड :** औरवाड येथील प्रगतशील शेतकरी व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री जयवंत गुंडाप्पा कोले यांचे चि.प्रीतम कोले व बोरगावचे बाबासाहेब पाटील यांची कन्या भक्ती पाटील यांच्या लग्न सोहळा निमित्त त्यांनी एक नवा आदर्श घातला.

लग्न सोहळ्यामधील ज्या अक्षता म्हणून तांदळाचा उपयोग होतो ते फेकून दिल्याने अन्नाची नासाडी होते हे होऊ नये म्हणून त्यांनी तो तांदूळ जानकी वृद्धाश्रम घोसरवाड व बालोद्यान अनाथाश्रम अब्दुल लाट येथे जाऊन त्यांच्या एकवेळच्या जेवण बनवण्यासाठी तांदूळ, रवा, जेवणासाठी चे इतर साहित्य दिले.

तसेच नृसिंहवाडी येथील गो शाळेत जाऊन गोमातेस आहार दान व त्यांची सेवा केली.



**लग्न सोहळ्यातील अक्षता ऐवजी केले वृद्धाश्रम व अनाथाश्रमात अन्नदान ,केली गोमातेची सेवा**

यावेळी बोलताना जयवंत कोले व सौ. पद्मजा कोले म्हणाले की नेहमी आम्ही इतरांच्या लग्न सोहळ्यासाठी जात असतो. त्यावेळेला एक गोष्ट आमच्या नजरेस पडत होती ती म्हणजे लग्न सोहळ्यामध्ये अक्षदा म्हणून तांदळाचा उपयोग व्हायचा, लग्न समारंभ पार पाडल्यानंतर ही अक्षदा तांदूळ याची नासाडी व्हायची. ही नासाडी आम्हाला चैन बसू देत नव्हती, कसे करायचे लोकांना कसे समजावून सांगायचे ही खंत नेहमी मनामध्ये राहायची पण स्वतःच्या मुलाच्या लग्नात हा बदल केला. लग्न सोहळ्यामध्ये अक्षदासाठी तांदळाचा उपयोगच केला नाही. आलेल्या सर्व लोकांना तांदूळ अक्षदा म्हणून दिल्या नाहीत.

तोच तांदूळ व जेवणासाठी चे इतर साहित्य वृद्धाश्रम,अनाथ आश्रम येथे देण्यात आला.

सामाजिक बांधिलकी जपताना काही परंपरागत रितीरिवाजामध्ये सुद्धा बदल करणे आवश्यक असते हा बदल आपल्यापासून करताना मनाची तयारी खूप भक्कम हवी असते. ती तयारी या पालकांनी दाखवली.

या दीडशे कोटीच्या लोकसंख्येच्या देशामध्ये अशा या सोहळ्यांमधून अक्षदाच्या रूपामध्ये तांदळाची किती नासाडी होत आहे. याचा विचार करणे काळाची गरज आहे कित्येक लोक उपाशीपोटी अर्धपोटी झोपी जात असतात आणि आपण या आपल्या कार्यामध्ये अशा पद्धतीने अन्नाची नासाडी करतोय याचा प्रामुख्याने विचार होणे हे अत्यंत महत्त्वाचे बनले आहे

यासाठी नवदांपत्यानेही त्याला होकार दिला व शिरोळ तालुक्यामध्ये एक नवा आदर्श उभा केला.

# प्रभाग क्र ९ मधील कामाचे मा नगरसेवक अमोल बालवडकर यांच्या हस्ते शूभारंभ

**बाणेर,बालेवाडी :** बाणेर,बालेवाडी प्रभाग क्र ९ मधील फर्म्फर्ट झोन सोसायटी बालेवाडी मा आमदार यांच्या निधीतून येथील फुटपाथचे काम करण्या करिता आज कामाचे शूभारंभ मा नगरसेवक अमोल बालवडकर यांच्या हस्ते करण्यात आले

मा आमदार चंद्रकांत पाटील यांच्या निधीतून बालेवाडी प्रभाग क्र ९ मधील फर्म्फर्ट झोन सोसायटी जवळील फुटपाथच्या कामाकरिता निधी मंजूरात मिळाली होती फार दिवसा पासून या कामाला सूरवात झाली नव्हती आज या कामाला सूरूवात करण्या करिता नारळ फोडून ऊद्घाटन करण्यात आले बालेवाडी,बाणेर अनेक रस्त्यांची कामे फुटपाथची कामे झाली



नव्हती याचा त्रास जनतेला आणि येथिल रहिवाश्यांना भोगावा लागत होता अनेक कामे अमोल बालवडकर यांनी मार्गी लावून पूर्ण केली या विभागाचा सतत विकास व्हावा आणि राहलेली कामे पूर्ण होण्याकरिता यांनी यांचे सहकरी लहूजी बालवाडकर तसेच गणेश कळमकर यांच्या माध्यमातून कामे मार्गी लावली यात यांचा सूध्दा मोलाचा वाटा आहेगेल्या अनेक वर्षा पासून बालेवाडी,बाणेर,सुस,म्हाळूंगे या विभागातील अनेक कामे अपूर्ण होती जनतेची मागणी आणि या विभागाचा विकास पाहता कामे मार्गी लावण्याचा अमोल बालवडकर यांचा घारीचा वाटा आहे सतत विकासाचा घाट असणारे अमोल बालवडकर,लहूजी बालवडकर,गणेश कळमकर हे या विभागाचा विकास होण्या करिता सतत झटत असतात मग पिण्याचा पाण्याचा प्रश्न असो, जनतेचे लहान लहान कामे असो त्यात रेशन कार्ड,आधार कार्ड, आयूश्यमान कार्ड किंवा सर्व सामान्य गरीब जनतेला भेडसावणारे कोणतीही समस्या असो हे सतत जनते करिता धावत येतात,

प्रभाग क्र ९ मधील फुटपाथची समस्या अनेक दिवसा पासून होती आज याचा कामाला सूरवात होणार हे येथिल राहणारे जनते करिता समाधानाची बाब आहे एक विषेश बाब या प्रसंगी एक वयस्कर व्यक्ती चक्कर येऊन पडला असता उघ्दाटन बाजूला ठेऊन लहूजी बालवडकर हे पूढे येऊन त्या व्यक्तीस ऊपचारा साठी पाठविण्यात पूढाकार घेतला हे विषेश या उघ्दाटन प्रसंगी अमोल बालवडकर,गणेश कळमकर, लहूजी बालवडकर तसेच या प्रभागातील असंख्य नागरिक आणि भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# जुगाराच्या अड्ड्यावर फलटण ग्रामीण पोलिसांच्या धाडी

**फलटण :** फलटण पुसेगाव मार्गावरील ताथवडे तालुका फलटण गावच्या हद्दीत उघड्या माळावर झाडाखाली सुरू असलेल्या जुगाराच्या अड्ड्यावर फलटण ग्रामीण पोलिसांनी टाकलेल्या धाडीत चार लाख ८१ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पाच जणांना पोलिसांनी अटक केली असून दोघेजण पळून जाण्यात यशस्वी ठरले आहेत.

तन्वीर अस्लम पटवेकर वय २४, प्रकाश भानुदास गार्डी वय ३०, शेखर तुकाराम थोरात,

नाना मसुगडे सर्वजण रा. ढवळ ता. फलटण, दीपक बापू जाधव वय ४१, रा. वाघोशी, ता. फलटण, पोपट संपत तरटे वय ३९ रा. माळवाडी, ता. फलटण, मल्हारी नामदेव जाधव वय २६, रा. फलटण अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. यातील शेखर तुकाराम थोरात व नाना मसुगडे दोघेही रा. ढवळ, ता. फलटण हे घटनास्थळातून पळून गेले असून उर्वरित संशयितांना पोलिसांनी अटक केली आहे. या बाबत ग्रामीण पोलिस ठाण्याकडून समजलेली माहिती अशी, बुधवार दि. २१ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी पाचच्या सुमारास पोलिसांनी ताथवडा ता. फलटण गावच्या हद्दीतील एका उघड्या माळावरील जुगाराचा अड्डा चालू असल्याची माहिती ग्रामीण पोलिसांना मिळाली होती, त्यानुसार त्यांनी तेथे धाड टाकली असता सदर संशयित आरोपी तीन पाणी पत्त्यावर जुगार खेळताना मिळून आले. घटनास्थळाहून पोलिसांनी साडे नऊशे रुपये रोख व पाच मोटारसायकली असा एकूण चार लाख ८१ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. संबंधितांवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाद्वारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची फिर्याद पोलीस कॉन्स्टेबल श्रीकांत खरात यांनी दिली असून तपास पोलिस नाईक पवार करीत आहेत.

दरम्यान फलटण तालुक्यातील ग्रामीण भागात जर कुठेही अवैध धंदे सुरू असतील तर त्याची माहीत फलटण ग्रामीण पोलिस ठाण्यात द्यावी, माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल असे आवाहन पोलिस निरीक्षक सुनील महाडिक यांनी केले आहे.



## छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमीत्त कार्यक्रमाचे आयोजन

**बाणेर,बालेवाडी :** क्रिडा व यूवक संचनालय म. राज्य आणि अमोल बालवडकर फाऊंडेशन यांच्यावतीने म्हाळूंगे बालेवाडी येथिल श्री शिवछत्रपती क्रीडा संकूल मध्ये युगपूरूष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमीत्त शिव व्याख्यान, शस्त्राचे प्रदर्शन ,मर्दानी खेळ,ढोल तासांचे पथक, पोवाडा, कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बाणेर गावठाणच्यावतीने एक गाव एक शिवजयंती उत्सव श्री छत्रपती शिवाजी महाराज बाणेर येथे साजरा करण्यात आला तसेच आखिल बालेवाडी शिवजयंती मोहत्सवा निमीत्त मिरवणूक काढून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सव साजरा करून ठिकठिकाणी मानवंदना देण्यात आली.

या कार्यक्रमा निमीत्त अमोल बालवडकर, गणेश कळमकर, लहूजी बालवडकर असंख्य गावकरी ऊपस्थित होते बाणेर गावठाण मधील ऊत्सवा निमीत्त श्री छत्रपती शिवाजी स्मारक समीतीचे पदाधिकारी आणि जयेश मूरकूटे यांनी मानवंदना दिली.

# सिद्धी आर्वीकर यांचे बँकॉक येथे संशोधन पेपर सादरीकर

**नारायणगाव :** ग्लोबल रिसर्च कॉन्फरन्स फोरम पुणे, ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, पुणे आणि फरानाखोन राजाभट युनिव्हर्सिटी बँकॉक, थायलंड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय व आंतरशाखीय शैक्षणिक परिषदेत कुमारी सिद्धी स्वाती श्याम आर्वीकर हिने उद्योजकीय शिक्षण आणि प्रशिक्षण - आव्हाने व संधी या विषयावर शोधनिबंधाचे सादरीकरण केले. जगभरातील ५० विद्यार्थ्यांनी आणि १०० प्राध्यापकांनी सदर आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंधाचे सादरीकरण केले. विद्यार्थी गटात कुमारी सिद्धी स्वाती श्याम आर्वीकर हिने प्रथम क्रमांक मिळविला. तिला प्रथम क्रमांकाचे बक्षीस, मानपत्र व मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. थायलंडच्या पंतप्रधानांचे सल्लागार पिचाइ



नरिप्थाफन, फरानाखोन राजाभट विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रियांग कित्रातपोर्न, अरुणाचल प्रदेश मधील हिमालयन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रकाश दिवाकरण यांच्या हस्ते कुमारी सिद्धी आर्वीकर हिला गौरवण्यात आले. कुमारी सिद्धी हिला तिच्या परिषदेतील सहभागासाठी ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषीरत्न अनिल मेहेर, व प्राचार्य डॉ.ए.बी. कुलकर्णी यांनी उपस्थितांना ऑनलाईन मार्गदर्शन केले. ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटे, उपाध्यक्ष सुजित खैरे, कार्यवाह रवींद्र पारगावकर, उपकार्याध्यक्ष डॉ. आनंद कुलकर्णी आणि प्राचार्य ए. बी. कुलकर्णी यांनी बहुमोल प्रोत्साहन व सहकार्य केले. शोधनिबंध तयार करून घेणे आणि त्याबाबत संशोधन मार्गदर्शन करणे यासाठी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ.जे.पी.भोसले यांनी विशेष परिश्रम केले.

सिद्धी आर्वीकर हिचे सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी वर्ग आणि समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## पाटी एकांकिकेने पटकावला लक्ष्मण जगताप करंडक

पिंपरी : लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या जयंतीचे औचित्य साधून लोकनेते लक्ष्मणभाऊ कला आणि क्रीडा अकादमीच्या वतीने लक्ष्मण जगताप करंडक राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये एकदम कडक नाट्यसंस्था मुंबईच्या पाटी एकांकिकेने सर्वोत्कृष्ट एकांकिकेचा मान पटकाविला.





# विद्यार्थ्यांनी घेतले मानसिक ताण-तणाव व्यवस्थापनाचे धडे

**पिंपरी :** पीसीएमसी स्मार्ट सारथी आणि श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचलित संघवी केशरी कला आणि वाणिज्य महाविद्यालय चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी 'मानसिक ताण-तणाव व्यवस्थापन' याविषयी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गौतम भोंग यांनी भूषविले.

योग प्रशिक्षक आणि आहारतज्ज्ञ रितू सिंग यांनी विद्यार्थ्यांवर येणारा मानसिक दबाव तसेच ताण तणाव याविषयी मार्गदर्शन केले. सध्याच्या धावपळीच्या काळात विद्यार्थी दिवसभर व्यग्र असतात. त्यामुळे त्यांना दररोज स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यास पुरेसा वेळ मिळेलच असे नाही. परंतु विद्यार्थ्यांनी आपल्या मानसिक आरोग्याकडे आवर्जून लक्ष दिले पाहिजे, असे सांगताना तणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी करावयाचे अनेक उपायदेखील सुचविले. आपल्या आवडत्या क्षेत्रात काम करून आनंदी राहण्याचा बहुमूल्य कानमंत्र यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. सदर कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे संयोजन प्रा. अभिषेक आकणकर, प्रा. प्रवीण जावीर यांनी केले. प्रा. नितीन जाबरे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी पीसीएमसी स्मार्ट स्मार्ट सारथीचे बिनीश सुरेंद्रन, किरण लवटे यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# खटाव तालुक्यात मराठी उद्योजकांना त्रास देणाऱ्या मनसेच्या पदाधिकाऱ्याच्या हकलपट्टी करण्याची मागणी

**वडूज :** मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे जागरूक असतात. परंतु सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात एका मनसे च्या पदाधिकाऱ्यांनी मराठी माणसालाच म्हणजे ठेकेदारी करणाऱ्या व्यक्तीला अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

या पदाधिकाऱ्याविरुद्ध सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्याकडे लेखी निवेदन देऊन ट्रॉसिटी नुसार गुन्हा दाखल करावा .अशी मागणी बहुजन मुक्ती पार्टीचे श्री तुषार मोतलिंग यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

खटाव तालुक्यातील भूषणगड या ठिकाणी जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सुमारे दोन वर्षापूर्वी काम सुरू केले होते. या कामाची प्रशासकीय मान्यता, कामाची गुणवत्ता व कामाचे आदेश अशा सर्व प्रकारच्या कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली होती .हे काम सुशिक्षित मराठी उद्योजक शिवराज झेंडे यांनी बँकेचे कर्ज काढून पूर्ण केले आहे. सध्या अंतिम बिलासाठी त्यांनी सर्व कागदपत्राची पूर्तता केली आहे.

त्यांचे बिल मिळण्यापूर्वी खंडणी द्यावी या मागणीसाठी मनसेच्या एका पदाधिकाऱ्यांनी खटाव तहसील कार्यालयात चुकीची माहिती देणारे निवेदन दिले आहे. सदर हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा असल्यामुळे बहुजन मुक्ती पार्टीचे राज्यसचिव तुषार मोतलिंग यांनी आज जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख यांची भेट घेऊन ट्रॉसिटी नुसार कारवाई करावी. अशी मागणी केली आहे. तसेच सदर पदाधिकाऱ्याला मनसेने पदमुक्त करावे कारण मनसे संघटना ही लोकांना न्याय देण्यासाठी आहे पण काही झाले तरी शुक्राचार्य हे मनसे बदनाम करत आहेत त्यामुळे त्यांची पक्ष्यातून हाक्कलपट्टी करावी. अशी मागणी केली आहे. या गोष्टीमुळे खळबळ वाजले आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना मराठी माणसांच्या विकासासाठी असताना खटाव मधील त्या दिगंबर अवस्थेतील पदाधिकाऱ्यांनी जे कृत्य केलेले आहे. दस्तुरखुद मनसेच्या प्रामाणिक पदाधिकाऱ्यांनी निषेध व्यक्त करून त्यांच्या विरोधात यापूर्वी अशाच तक्रारी दाखल केल्या आहेत. अशी ही माहिती दिली आहे.

एका व्यक्तीमुळे जर संघटना बदनाम होत असेल तर अशा पदाधिकाऱ्याला स्थान देवू नये. हे पक्षाच्या दृष्टीने हिताचे ठरणार आहे.

दरम्यान याबाबत संबंधित भूषण गड ग्रामपंचायत ग्रामसेवकाने बिल देण्यास विलंब लावल्यास त्यांच्या विरोधातही कारवाई व्हावी. यासाठी सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी भेट घेणार असल्याची माहिती श्री मोतलिंग यांनी दिली आहे. यावेळी त्यांच्यासोबत अजित नलावडे, सोमनाथ आवळे व शिवराज झेंडे उपस्थित होते.

## कोरेगावात गांजा विक्री प्रकरणी एकास अटक

**कोरेगाव :** कोरेगाव पोलिसांनी कोरेगाव शहर हद्दीत साईनगर, मार्केट यार्ड शेजारी रहात्या घराच्या आडोशाला सुरु असणाऱ्या गांजा विक्री अड्यावर छापा मारून ६४७५/- रुपयांचा २६१ मिलीग्राम वजनाचा गांजा जप्त केला. संशयित आरोपी महम्मद गुलाब शेख रा-साईनगर,मार्केटयार्ड याच्या विरूद्ध एन.डी. पी.एस. अँक्ट १९८५ मधील कलम ८ (क) ,२०(ब)(२)(अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल गणेश भोग यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

मौजे कोरेगाव ता कोरेगाव गावचे हद्दीत साईनगर, मार्केट यार्ड शेजारी संशयित आरोपी महम्मद गुलाब शेख याच्या रहात्या घराचे आडोशाला गांजा या अंमली पदार्था विक्री करीत असताना छापा मारला. या छाप्यात एकूण ६४७५/- रुपयांचा २६१ मिलीग्राम वजनाचा गांजा जप्त केला.

# मराठवाडा, विदर्भावर पुन्हा अवकाळीचे ढग ?

**पुणे :** विदर्भ आणि मराठवाड्यावर पुन्हा अवकाळीचे ढग जमा झाले आहेत. शनिवारपासून पुढील पाच दिवस विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या एक पश्चिमी विक्षोप (थंड हवेचा झंझावात) हिमालयीन परिसरात सक्रिय आहे. शनिवारी, २४ फेब्रुवारीला आणखी एक पश्चिम विक्षोप सक्रिय होण्याचा अंदाज आहे. दरम्यान, एक कमी दाबाची रेषा मराठवाड्यापासून दक्षिण तमिळनाडूपर्यंत सक्रिय आहे. या हवामानविषयक स्थितीचा परिणाम म्हणून मराठवाड्यात रविवार, २५ फेब्रुवारी ते मंगळवार, २७ फेब्रुवारी दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे. विदर्भात पावसाचा काहीसा जोर राहण्याचा अंदाज आहे. शनिवारपासून पुढील पाच दिवस हलक्या सरी पडण्याचा अंदाज आहे. रविवार आणि सोमवारी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्रात पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे.

### किमान तापमानात घट शक्य

**उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेचा परिणाम म्हणून पुढील तीन दिवस नाशिक, नगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत पहाटेच्या किमान तापमानात काहीशी घट होण्याचा अंदाज आहे, अशी माहिती हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. माणिकराव खुळे यांनी दिली आहे.**

# आमदार गोरेंचं ठरलं! फलटणमध्ये जाऊन रामराजेंना भिडणार

**फलटण -** विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांच्या टीकेला मी फलटणमध्ये जाऊन आव्हान देणार आहे. रामराजेंचे आणि माझे मैत्रीचे संबंध आहेत. त्यांची विधाने त्यांच्या उंचीला शोभतात का? असा टोला माणमधील भाजपचे आमदार जयकुमार गोरे यांनी लगावला आहे.

आमदार जयकुमार गोरे यांनी येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकारांशी संवाद साधला. येत्या २५ फेब्रुवारीला सकाळी अकरा वाजता उपमुख्यमंत्री Devendra Fadnavis यांच्या हस्ते जिहे-कठापूरच्या सिंचन योजनेच्या पाण्याचे जलपूजन आंधळी धरण येथे होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांच्या टीकेलाही उत्तर दिले.

रामराजेंचे आणि माझे मैत्रीचे संबंध तुम्हाला सगळ्यांना महिती आहेत. त्यामुळे त्यांच्यावर जास्त



काही बोलाव असं वाटत नाही. त्यांची विधाने त्यांच्या उंचीला शोभतात का, असा प्रश्न आमदार जयकुमार गोरे यांनी केला. रामराजे अनेकांना सांगतात की, गोरे किंमत ठेवत नाहीत. शेवटी ही गिव्ह ण्ड टेक पॉलिसी असते. किंमत द्यावी लागते तेव्हा किंमत मिळते, असा सल्ला देत त्यांनी त्यांची भूमिका मांडली. आता भूमिका मांडण्याची वेळ माझी आहे, आणि ती मी फलटणमध्ये जाऊन मांडणार आहे, असा थेट इशाराच जयकुमार गोरे यांनी दिला.

### माढ्यात भाजपचाच उमेदवार'

**माढा लोकसभा मतदारसंघातून रणजितसिंह निंबाळकर हे खासदार होऊ नयेत यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नाबाबत त्यांना विचारण्यात आले. त्यावेळी रामराजे आमच्याबरोबर नव्हते तरीही रणजितसिंह खासदार झाले. तेव्हाही खासदार भाजपचाच होता आणि आताही भाजपचाच असणार आहे. सातारा व माढा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक लढण्यास भाजप सक्षम आहे. त्यामुळे येथील उमेदवार आमच्याच पक्षाचा असेल, असेही आमदार गोरे यांनी स्पष्ट केले.**

# पाठपुरावा शरद पवारांच्या खासदाराचा अन् कामांचा शुभारंभ मोदींच्या हस्ते...!

**सातारा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सातारा जिल्ह्यातील सहा विकासकामांचा प्रारंभ २६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. कराड आणि लोणंद रेल्वे स्टेशनचा अमृत महोत्सव योजनेतून कायापालट करण्यात येणार आहे. या कामांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार श्रीनिवास पाटील यांनी पाठपुरावा केला आहे. पंतप्रधानांच्या हस्ते कामाचा शुभारंभ होत असला तरी खासदार श्रीनिवास पाटील यांनी प्रश्न मार्गी लावल्याने राष्ट्रवादीच्या शरद पवार गटात आनंदाचे वातावरण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने या कामाचा शुभारंभ होणार आहे.

पुणे-मिरज रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरण व विद्युतीकरण प्रकल्पात गेलेल्या सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीला मोबदला मिळवून




देण्याचा प्रश्न, नागरिकांना येण्या-जाण्यासाठी रेल्वेचे अंडरपास ब्रिज किंवा ओव्हरपास ब्रिज मंजूर करणे, रेल्वे स्थानकांची सुधारणा करणे आदी विषयांवर खासदार श्रीनिवास पाटील यांनी लोकसभेत अनेकदा आवाज उठवला आहे. त्यातील बरेचसे प्रश्न त्यांनी मार्गी लावले आहेत. तसेच, वेळोवेळी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. रेल्वेच्या विभागीय बैठकीतही त्याविषयी आग्रही पाठपुरावा केला होता. सातारा रेल्वे स्टेशनचे आधुनिकीकरण यापूर्वीच झाले आहे. आता खासदार पाटील यांच्या प्रयत्नांतून कराड आणि लोणंद रेल्वे स्टेशनवर अद्ययावत सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी या दोन्ही स्टेशनचा समावेश अमृत महोत्सव योजनेमध्ये झाला आहे. तसेच, स्थानिक नागरिकांना, शेतकऱ्यांना रेल्वेमार्ग ओलांडताना अडचणी येऊ नयेत, त्यासाठी वेळ वाया जाऊ नये याकरिता ठिकठिकाणी रेल्वे अंडरपासची (बोगदा) आणि उड्डाणपुलांची मागणी श्रीनिवास पाटील यांनी केली होती. त्यानुसार पिंपोडे खुर्द, शिरढोण, जरंडेश्वर आणि पार्ले येथे रेल्वे अंडरपास ब्रिज होणार आहेत.

### खासदारांनी मानले आभार

**रेल्वे अंडरपास आणि कराड, लोणंद या रेल्वे स्टेशनचा होणारा कायापालट सातारा जिल्ह्याच्या विकासाला चालना देणारा ठरेल, असा विश्वास खासदार श्रीनिवास पाटील यांनी व्यक्त केला आहे. त्याबद्दल त्यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, राज्यमंत्री रावसाहेब दानवे, रेल्वेचे जनरल आणि डिव्हीजनल मॅनेजर यांचे आभार मानले आहेत.**



# अनुप शहा भाजपचे नवीन फलटण शहराध्यक्ष

**फलटण -** भारतीय जनता पार्टी फलटण शहरच्या अध्यक्षपदी माजी नगरसेवक अनुप शहर यांची निवड खासदारांची निंबाळकर यांचे विश्वासू व फलटण नगरपालिकेतील अभ्यासू नेतृत्व म्हणून माजी नगरसेवक अनुप यांच्याकडे पाहिले जाते गेले पंधरा वर्षे नगरसेवक , माझी विरोधी पक्षनेते तसेच भाजपा अल्पसंख्याक मोर्चा चे महाराष्ट्राचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून प्रदेश कार्यकारणी मध्ये काम करण्याचा अनुभव आहे.

या सर्वांचा आधार घेत अनुप शहा यांना खासदारकी तसेच आमदारकी व येणारी फलटण नगर परिषद निवडणूक पाहता फलटण शहर तालुका येथे विवरचनाकार म्हणून भविष्यात दिसतील.

अनुप शहा यांचा असलेला प्रशासकीय अनुभव व नगरपालिकेतील पकड याचा येणाऱ्या निवडणुकीत पक्षाला निश्चितच फायदा होईल असे मत खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांनी व्यक्त केले. लोकप्रिय खासदार श्री रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे विश्वासू सहकारी

श्री अनुप शहा (मा. नगरसेवक फलटण नगर परिषद) यांची भारतीय जनता पार्टी फलटण शहर अध्यक्षपदी निवड त्याबद्दल संपर्क कार्यालय येथे सत्कार करण्यात आला यावेळी खालील सर्वजण उपस्थित होते

श्री अभिजीतभैया नाईक निंबाळकर (चेअरमन स्वराज नागरी सहकारी पतसंस्था फलटण) तालुकाध्यक्ष बजरंग गावडे अमोल सस्ते श्री तुकारामआबा शिंदे (उपाध्यक्ष सातारा जिल्हा भारतीय जनता पार्टी) माजी नगरसेवक अशोकराव जाधव, सचिन अहिवळे, महादेव अलगुडे, सिराजभाई शेख,सुनील जाधव, सागर शहा, राजाभाऊ निंबाळकर, रोहित नागटिळे, महेश लवळे, संदीप लवळे, सुनील घोलप व इतर भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# पर्यटन विकासातून दुर्गम भागातील नागरिकांना रोजगाराची संधी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळांच्या एकात्मिक विकासाकरिता पर्यटन विकास आराखड्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीत मान्यता देण्यात आली. या आराखड्यासाठी सुमारे ३८१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून श्री क्षेत्र महाबळेश्वर, प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सह्याद्री व्याघ्र राखीव व वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन विभागांतर्गत कोयना नदी जलपर्यटनाचा समावेश आहे.

मुनावळे येथे महिन्याभरात वॉटर स्पोर्टस सुरू करण्यात येणार असून नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर वॉटर स्पोर्टस् असणारा हा पहिला प्रकल्प ठरणार असून त्यामुळे स्थानिकांना रोजगाराची मोठी संधी निर्माण होणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे सातारा जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार मकरंद पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरव विजय, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी, उपस्थित होते. पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी यावेळी विकास आराखड्याचे सादरीकरण केले.

हा संपूर्ण परिसर निसर्गसंपन्न असून पर्यटनवृद्धीसाठी मोठी संधी आहे. याठिकाणी निसर्ग पर्यटन, दुर्गभ्रमंती, धार्मिक पर्यटनाबरोबरच वॉटर स्पोर्टस् देखील करता येणार असल्याने या आराखड्याची अंमलबजावणी जलदगतीने करावी. असे निर्देश देतानाच पर्यटन विकासाच्या दृष्टीने होणाऱ्या कामांमुळे स्थानिकांना रोजगार मिळणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

मुनावळे येथे नदीत जलपर्यटन आणि वॉटर स्पोर्टस् सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी कृष्णा खोरे महामंडळ आणि एमटीडीसी यांच्यामध्ये लवकरच सामंजस्य करार करण्यात येणार आहे. याठिकाणी नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर वॉटर स्पोर्टस् चे विविध प्रकार, बोटींग करता येणार आहे. त्यामुळे परिसरात पर्यटन विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. त्यासाठी पर्यटन महोत्सव आयोजित करावा, संकेतस्थळ विकसित करण्यात यावे, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिल्या.

सह्याद्री व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास आराखड्यामध्ये प्रेक्षागृह, तंबू निवास, सफारी मार्गाचे बळकटीकरण, पर्यटन सफारीकरिता वाहने, आदी विविध कामे करण्यात येणार आहे. प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन अंतर्गत किल्ला जतन, दुरूस्तीचे कामे, संग्रहालय निर्मिती, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, विद्युतीकरण, सीसीटिव्ही यंत्रणा आदी कामांचा समावेश आहे. श्री क्षेत्र महाबळेश्वर पर्यटन विकास आराखड्यामध्ये मंदिर व परिसर विकास, वाहन तळ, बाजारपेठ विकास कामे, अन्नछत्र, मंदिर परिसरातील प्राथमिक शाळा, आदी विविध विकास कामांचा समावेश आहे.

### वनसंपदेचे संरक्षण करण्यासाठी 'आय लव्ह पाचगणी' फेस्टिवल टीमचा पुढाकार

**पाचगणी :** निसर्गाचे वरदान असलेल्या पाचगणी व परिसरातील वनसंपदेचे संरक्षण करण्यासाठी 'आय लव्ह पाचगणी' फेस्टिवल टीमने पुढाकार घेतला असून यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी व अतिरिक्त पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली उद्या (शुक्रवार २३ फेब्रुवारी)सायंकाळी पाच वाजता पाचगणी रोटरी क्लब येथे बैठक आयोजित केली असल्याची माहिती फेस्टिवल टीमचे अध्यक्ष शिवाजी शिंदे यांनी दिली.शहर व परिसरातील पर्यावरणप्रेमी व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

महाबळेश्वर तालुक्याला दरवर्षी वणव्याचे ग्रहण लागत असल्याने वनसंपदेचे मोठे नुकसान होत असून पशुपक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.त्याचबरोबर जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याची समस्या निर्माण होते, डोंगररांगातील दुर्मिळ वनस्पतीचा खजिना नष्ट होतो.

# वडूज येथे आजपासून नवतेजस्विनी महोत्सव

वडूज : महिला आर्थिक विकास महामंडळ सातारा द्वारे मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण कार्यक्रमा अंतर्गत तहसीलदार कार्यालय वडूज येथे २३ ते २६ फेब्रुवारी २०२४ कालावधीत बचत गट उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान अंतर्गत नवतेजस्विनी महोत्सवाचे उदघाटन आ. जयकुमार गोरे यांचे शुभहस्ते २३ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे.

प्रदर्शनात ६० बचत गटांचे चाळीस पेक्षा अधिक स्टॉल सहभागी होणार आहेत .

उदघाटन कार्यक्रमास उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी शेंडगे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी भाग्यश्री फरांदे, ,जिल्हा व्यवस्थापक नाबार्ड, राजेंद्र चौधरी,तहसीलदार बी. एस. माने,जिल्हा महिला व बालविकास अधिकारी विजय तावरे उपस्थित राहणार आहेत.

या प्रदर्शनात बचत गटातील महिलांनी तयार केलेले लोणची,पापड, मसाले, मातीची नक्षीदार भांडी, साड्या ,ज्वेलरी , महिला व लहान मुलांचे कपडे आणि खेळणी, बिस्किटे, हर्बल प्रोडॉक्ट आदींसह विविध खाद्यपदार्थांची रेलचेल महोत्सवात असणार आहे.

बचत गटातील महिलांना शासकीय योजना,बँक कर्ज,कौशल्य विकास या विषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.तरी जास्तीत जास्त नागरिकांनी प्रदर्शनास भेट द्यावी असे आव्हान माविम चे जिल्हा समन्वयक विजय डोके यांनी केले आहे.